महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (प्रशासन शाखा) मधील शिक्षणाधिकारी व तत्सम या संवर्गातील सरळसेवा कोट्यातील पदांवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारास नियुक्ती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांकः ससेप्र-४४१६/प्र.क्र.१६६/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १८ डिसेंबर, २०१७

<u>वाचा</u> :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.१५(१)(२४)/१०९६८/दहा, दिनांक ७ मे, २०१६

<u>प्रस्तावना:-</u>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षेतून अर्हताप्राप्त न ठरलेल्या श्री. नामदेव शेंडकर व इतर यांनी मॅट मुंबई येथे मूळ अर्ज क्र. ९०६/२०११ दाखल केला होता. त्यामध्ये श्रीमती वैशाली दत्तात्रय झनकर ह्या देखील वादी (वादी क्र.९) होत्या. श्रीमती झनकर यांनी ऑनलाईन अर्जामध्ये क्रिमिलेअर असल्याचा दावा केला होता व त्यांच्याकडे विहित शैक्षणिक अर्हता नव्हती. त्यामुळे त्या अराखीव सर्वसाधारण वर्गवारीतून अर्हता प्राप्त ठरल्या नाहीत. तथापि, श्रीमती झनकर यांच्याकडे पदव्युत्तर पदवी व पी.एचडी. या पदव्या असल्याने व त्यांनी मुलाखतीच्या वेळेस प्रगत उन्नत गटात (नॉन क्रिमिलेअरमध्ये) मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले असल्याने मा. मॅट व मा. उच्च न्यायालयाने त्यांचा दावा मान्य केला आहे. मूळ अर्ज क्र. ९०६/२०११ निकाली काढताना श्रीमती. झनकर यांच्या उत्तरपत्रिकेची पुन:तपासणी करुन ते गुण मुलाखतीच्या गुणात समाविष्ठ करावे व गुणवत्ता यादी तयार करावी आणि जर ते शिफारसपात्र ठरत असतील तर त्यांचा नियुक्तीसाठी विचार करावा, असा निर्णय मा. मॅट यांनी दिनांक १५.०४.२०१३ रोजी दिला आहे. सदर निर्णयाविरुद्ध आयोगाने दाखल केलेले अपील मा. उच्च न्यायालयाने दिनांक २९.०२.२०१६ च्या आदेशान्वये खारीज केले असून, त्या निर्णयाचा संदर्भात दाखल केलेली पुनर्विलोकन याचिका सुद्धा खारीज केली आहे. मा. मॅट व मा. उच्च न्यायालयाने श्रीमती झनकर यांचा नॉन क्रिमिलेअर व शैक्षणिक अर्हता याबाबतचा दावा मान्य केल्यामुळे त्या इ.मा.व. (महिला) वर्गवारीसाठी चाळणी परीक्षा व मुलाखतीमधून शिफारसपात्र ठरत असल्याने श्रीमती झनकर यांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक ७.५.२०१६ च्या पत्रान्वये शिक्षणाधिकारी व तत्सम या पदासाठी केली आहे.

२. श्रीमती (डॉ.) वैशाली दत्तात्रय झनकर यांना पदस्थापना देण्यापूर्वी सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.११४/कार्या-१२, दिनांक १५.०६.२०१७ च्या अधिसूचनेद्वारे करण्यात आलेल्या सुधारणेनुसार श्रीमती झनकर यांच्याकडून महसूली विभागाचा विकल्प घेण्यात आला होता. श्रीमती झनकर यांनी दिलेला विकल्प विचारात घेऊन, प्रशासकीय कारणास्तव श्रीमती झनकर यांना नाशिक महसूली विभाग देण्यात येत आहे. सदर महसूली विभागात त्यांच्या पदस्थापनेबाबत शासन पुढील आदेश देत आहे.

<u>शासन आदेश</u>-

महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (प्रशासन शाखा) मधील शिक्षणाधिकारी व तत्सम या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील पद रिक्त होईपर्यंत पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त असलेल्या पदावर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मुळ अर्ज क्रमांक ९०६/२०११ या न्यायालयीन प्रकरणाच्या निर्णयानुसार वेतन बँड रू.१५६००-३९१०० (ग्रेड वेतन रू.५४००/-) या वेतन संरचनेतील शिक्षणाधिकारी व तत्सम या संवर्गातील स्तंभ क्र.(४) मध्ये नमूद पदावर पदस्थापना देण्यात येत आहे.

अ. क्र.	नाव	निवड झालेल्या पदाचा प्रवर्ग	पदस्थापनेचे ठिकाण
१	**२**	**३**	**४**
१	डॉ. वैशाली दत्तात्रय झनकर	इ.मा.व. (महिला)	शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नाशिक.

२. सदर पदस्थापना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) राज्याच्या प्रशिक्षण धोरणाच्या अनुषंगाने सदर उमेदवारांना विहीत पायाभूत प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील. सदर प्रशिक्षण संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत आयोजित करण्यात येईल. तसेच सदर प्रशिक्षणाचा कालावधी व रूपरेषा ठरविण्याचे अधिकार संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील.

२) सदर नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांचा परिविक्षा कालावधी दोन वर्षाचा राहील. सदर उमेदवारांची पहिली वेतनवाढ त्यांच्या एक वर्षाचा परिविक्षा कालावधी पूर्ण झाल्यानंतर व त्यानंतरची वेतनवाढ त्यांनी परिविक्षा कालावधी पूर्ण केल्यानंतर देण्यात येईल.

३) परिविक्षा कालावधीत सदर उमेदवारांना प्रचलित नियमाप्रमाणे आवश्यक असणारी विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसेच परिविक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. परिविक्षा कालावधीत त्यांनी कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा विहीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता, त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

४) उपरोक्त उमेदवार यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. तसे न झाल्यास संबंधित उमेदवारांचे वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

५) महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणांच्या अधिनतेने सदर उमेदवारांची जेष्ठता राहील. सदर

उमेदवारांनी त्यांच्या नियुक्तीच्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत रुजू व्हावयाचे आहे. काही अपरिहार्य कारणास्तव त्यांना रुजू होण्यास मुदतवाढ हवी असल्यास तसे सकारण लेखी कळवून मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या गुणवत्ता क्रमांकानुसार त्यांना जेष्ठता मिळणार नाही व ते हजर होतील त्या दिनांकापासून त्यांची जेष्ठता धरण्यात येईल.

६) वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील तरतुदी सदर उमेदवारांना लागू राहतील. तसेच दिनांक १ नोव्हेंबर २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्ती वेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांबाबत वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अंनियो-१००५/१२६/ सेवा-४, दिनांक १८ ऑगस्ट, २००९ मधील तरतुदी सदर उमेदवारांना लागू राहतील.

७) संबंधित उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेबाबत व इतर आवश्यक प्रमाणपत्राच्या मूळ प्रती तपासणीकरीता व साक्षांकित प्रतींचा संच पदस्थापना स्विकारण्याच्या वेळी संबंधित कार्यालय प्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांच्याकडे सादर कराव्यात आणि कार्यालय प्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांनी प्रमाणपत्रांची तपासणी करून संबंधित उमेदवाराला रुजू करून घ्यावे.

८) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संबंधित उमेदवारांनी सादर केलेली सर्व कागदपत्रे संबंधित सक्षम यंत्रणेमार्फत तपासण्याच्या सूचना केलेल्या आहेत. त्यामुळे तपासणीअंती उमेदवारांनी सादर केलेली कागदपत्रे खोटी अथवा बनावट आढळल्यास त्यांच्या सेवा कुठलीही पूर्व सूचना न देता तात्काळ संपुष्टात आणण्यात येतील.

९) संबंधित उमेदवारांनी या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसात नियुक्तीच्या पदावर रुजू व्हावे. विहीत कालमर्यादेत रुजू न होणाऱ्या उमेदवारांना सदर नियुक्तीमध्ये स्वारस्य नसल्याचे समजण्यात येईल आणि सदर नियुक्तीकरीता संबंधित उमेदवारांचा हक्क आपोआप संपुष्टात येईल.

१०) महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०१५ मधील नियम क्र.८ (१) (अ) नुसार वरील उमेदवारांची ज्या महसूली विभागात नियुक्ती झाली आहे, त्या विभागात किमान सहा वर्षे इतका सेवा कालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील.

११) शासकीय सेवेत रुजू झाल्यानंतर ज्या उमेदवारांना शासकीय सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्यांनी एक महिन्याची पूर्वसूचना शासनास देणे आवश्यक राहील अन्यथा त्यांना एक महिन्याचे वेतन शासनाकडे जमा करावे लागेल.

१२) उपरोक्त उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवास भत्ता देण्यात येणार नाही.

१३) वर नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांना लागू असलेले प्रचलित नागरी सेवा विषयक सर्वसाधारण नियम सदर उमेदवारांना लागू राहतील.

३. हे आदेश प्राप्त होताच संबंधित उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व याबाबतचा अहवाल संबंधित कार्यालय प्रमुखांनी आयुक्तांमार्फत शासनास सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१७१२१८१६४१३३८३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2017.12.18 16:57:19 +05'30'

(र. प्र. आटे)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

डॉ. वैशाली दत्तात्रय झनकर, ई-४०२/रामकृष्ण नगर, पोर्णिमा टॉकीज कम्पाऊंड, मुरबाड रोड, कल्याण (पश्चिम), जि. ठाणे-४२१३०१

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण,महाराष्ट्र राज्य,पुणे
२. सर्व शिक्षण संचालक
३. संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
यांना सदर उमेदवारांच्या पायाभूत प्रशिक्षणासंदर्भातील कार्यवाही तात्काळ करण्याच्या विनंतीसह.
४. महालेखापाल (लेखापरीक्षा), I व II महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), I व II महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
६. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, नाशिक
८. विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक
९. शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / निरंतर),नाशिक.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक
११. उपसचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ५१/२, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०० ०२१ (पत्राव्दारे)
१२. सर्व सहसचिव/ उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई.
१३. सर्व अवर सचिव/ कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,मुंबई.
१४. निवडनस्ती/ प्रशा-२ कार्यासन.

प्रत माहितीस्तव :-

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

२. मा.मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (शालेय शिक्षण), यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेते (विधानसभा/ विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक
५. मा.विधानसभा सदस्य/ मा.विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक
६. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक